# कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र
## गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल

अंक ९७/२०२०  दिनांक : ०४ /१२ /२०२०  कालावधी ५दिवस

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २८ /११ /२०२० ते ०४ /१२ /२०२०) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०५ /१२ /२०२० सकाळी ८:३० पासून ०९ /१२ /२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८/११ | २९/११ | ३०/११ | ०१/१२ | ०२/१२ | ०३/१२ | ०४/११ | | ०५/१२ | ०६/१२ | ०७/१२ | ०८/१२ | ०९/१२ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३१.८ | ३१.५ | ३३ | ३३ | | | | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३३ | ३४ | ३५ |
| २० | २० | २३ | २० | | | | किमान तापमान (अं.से) | २२ | २२ | २२ | २४ | २४ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ३ | ७ | ७ | ७ |
| ५८ | ७८ | ८६ | ८५ | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ५ | ४३ | ४३ | ४४ | ४६ |
| ३६ | ४६ | ४८ | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २६ | २२ | २० | २५ | २३ |
| ५.१ | ४ | २.९ | ३.४ | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ८ | ८ | ९ | ७ |
| द.नै. | उ. | द. | आ. द. | | | | वाऱ्याची दिशा | ई. पू. | पू. | पू. | पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ३१२०.२ | ४२३३.४ |

## हवामान आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| हवामान पूर्वानुमान | | • **प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक ५ ते ९ डिसेंबर,२०२० दरम्यान कमाल तापमान आणि वाऱ्याची गती वाढण्याची शक्यता आहे तसेच दिनांक ७ ते ९ डिसेंबर, २०२० दरम्यान आकाश ढगाळ राहील.** |
| सामान्य सल्ला | | • पुढील पाच दिवस वाऱ्याची गतीत वाढ होणार असल्याने शेतकऱ्यांनी किटक नाशकांची व किडनाशकांची फवारणी वाऱ्याची गती कमी असताना संरक्षक साधंने वापरुन संध्याकाळच्या वेळेला करावी. |
| हरभरा | वाढीची अवस्था | • पुढील पाच दिवस कमाल तापमानात वाढ होवून ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याने हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास प्रति हेक्टर ५-१० कामगंध सापळे आणि पक्षी थांबे लावावेत, तसेच संरक्षित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| वाल | वाढीची अवस्था | • वाल पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी प्रवाही डायमेथोएट ३० टक्के १२ मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| काजू | मोहोर | • ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याने मोहोर अवस्थेत असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. ही किड मोहोरातील रस शोषून घेते त्यामुळे मोहोर सुकून जातो. मोहोराचे ढेकण्या व फुलकिडीपासून संरक्षण करण्यासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| **आंबा** | **बोंगे फुटण्याची अवस्था** | • बोंगे फुटण्याच्या अवस्थेत असलेल्या आंब्यावर तुडतुड्यांचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली +हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आणि पालवी अवस्थेत असलेल्या आंब्याचे तुडतुडे आणि मिज माशीच्या प्रादुर्भावापासून संरक्षण करण्यासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही ९ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच आंबा पिकामध्ये किटक नाशकाच्या वेळापत्रकानुसार फवारण्या कराव्यात जेणेकरून तुडतुड्या मध्ये किटकनाशकाप्रति प्रतिकार करण्याची क्षमता वाढणार नाही. |
| **नारळ** | **वाढीची अवस्था** | • कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने नारळ व सुपारी बागेत बुंध्याभोवती आळे तयार करून ७ ते ८  दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **चिकू** | **वाढीची अवस्था** | • कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने नारळ व सुपारी बागेत बुंध्याभोवती आळे तयार करून ७ ते ८  दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **फुलपिके** | **पुर्नलागवड** | • झेंडू पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ४५ x ४५ से.मी. किंवा ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ४-६ टन शेणखत, ४३ किलो युरिया, १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्र द्यावी. पुर्नलागवड करण्याच्या पूर्व संध्येला रोपांना भरपूर पाणी दयावे तसेच रोप लागवडीच्या दिवशी मुख्य शेताला भरपूर पाणी दयावे व लागवड संध्याकाळी करावी. लागवडीसाठी कणखर १५-२० से.मी. उंचीचे ५-६ पाने असलेली रोपे निवडावी. पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १.५ मिली प्रति लिटर व ५० टक्के कार्बेन्डाझीम १ ग्रम प्रती लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवून घ्यावीत. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **वाढीची अवस्था** | • ढगाळ वातावरणामुळे काकडी, पडवळ, दुधीभोपळा, तांबडा भोपळा, दोडका, कारली इ. वेलवर्गीय पिकांवर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. या रोगामुळे पानांवर दोन्ही बाजूनी पांढऱ्या भुकटीच्या स्वरूपातील बुरशीची वाढ दिसून येते. नियंत्रणासाठी कार्बेन्डेझीम ५ ग्रॅम किंवा झायनेब २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **टोमॅटो** | **वाढीची अवस्था** | • पुनर्लागवडीनंतर ३० ते ३५ दिवसांनी झाडांची वाढ जोरदार झाल्यानंतर फांद्या व फुटी जोरात फुटतात, त्याकरिता त्यांना बांबू, सुतळी व तार यांनी आधार द्यावा. सरीच्या बाजूला ६ ते ९ फूट उंचीचे लाकडी बांबू जमिनीत रोवून घ्यावेत. जमिनीपासून १ मीटर उंचीवर दोन्ही खांबावर तार ओढावी व घट्ट बांधून बांबूने आधार द्यावा. लागवडीनंतर ३० ते ४५ दिवसांत झाडांना मातीची भर द्यावी. यासाठी झाडाच्या समोरील अर्धी सरी फोडून झाडाच्या बाजूस माती लावावी, त्यामुळे झाडाच्या खोडाला आधार मिळतो आणि मुळ्या फुटण्यास मदत होते. मातीतील हवेचे प्रमाण योग्य राहण्यास मदत होते. मातीची भर देताना झाड मातीमध्ये जास्त गाडले जाणार नाही, याची काळजी घ्यावी. |
| **कोबी** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाच दिवस ढगाळ वातावरणामुळे कोबीवर्गीय पिकांवर पानावरील ठिपके आणि करपा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येवू शकतो त्यांच्या नियंत्रणासाठी, मँकोझेब किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड २.५ ग्रॅम अधिक स्टिकर १ मिलि प्रति लिटर पाण्यातून फवारावे. |

| | | |
|---|---|---|
| भेंडी | **वाढीची अवस्था** | • रस शोषक किडी (मावा, तुडतुडे व पांढरी माशी) च्या नियंत्रणासाठी पिवळ्या रंगाचे चिकट सापळे एकरी २५ ते ३० असे शेतात लावावेत. |
| **पशुधन व्यवस्थापन** | | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे.<br>• जनावराना पिण्यासाठी कोमट व स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.** | | |
| **ई-मेल :kvkkosbad439@gmail.com** | | **संपर्क:8552882712** |

**स्त्रोत**

१) **हवामान पूर्वानुमान** : प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई

२) **मागील हवामान** : भात संशोधन केंद्र, पालघर

**ठिकाण** : कृषि विज्ञान केंद्र पालघर

**दिनांक** : ०४.१२.२०२०

**स्वाक्षरित**

**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र**

**कृषि विज्ञान केंद्र कोसबाड हिल**